R.No.MAHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ८८ शनिवार दि.११ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# राजकारणात गुंडगिरीला जागा नाही

पुणे : कोथरूडमधील अलीकडील गोळीबारानंतर घायवळ गँगचा म्होरक्या नीलेश घायवळ आणि त्याच्या टोळीच्या कारवायांमुळे पुणेच नव्हे तर राज्यभरातील राजकारणात खळबळ उडाली आहे. या प्रकरणावरून महायुतीतच एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. पुण्यात आज झालेल्या राष्ट्रवादी परिवार मिलन कार्यक्रमानंतर अजित पवार माध्यमांशी बोलत होते. पत्रकारांनी नीलेश घायवळ आणि सचिन घायवळ यांच्या संदर्भात विचारले असता त्यांनी स्पष्ट सांगितले की, मी स्वत: पोलिस आयुक्तांना सांगितले आहे, कोण कोणत्या पक्षाचा, कोणाचा कार्यकर्ता, कोणाच्या जवळचा आहे, हे काहीही बघायचे नाही. ज्याने कायदा हातात घेतला असेल, नियम मोडले असतील, त्याच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी, असे अजित पवार म्हणाले. त्यांनी यावेळी स्पष्ट केले की, कायद्यापुढे सर्व समान आहेत, आणि या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप सहन केला जाणार नाही. कायदा सर्वांसाठी समान आहे. कोणी मंत्री, कार्यकर्ता, किंवा कोणत्याही पक्षाचा असो, गुन्हा केला असेल तर शिक्षा होणारच. पुण्यात गुंडगिरी वाढू देणार नाही. सरकार कोणाचेही असो, कायदा आणि पोलिस त्यांचे काम निष्पक्ष राहिले पाहिजे असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.

शिफारस असली तरी परवाना दिला नाही गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी शस्त्र परवान्यासाठी शिफारस केली होती, असा आरोप होत आहे. यावर अजित पवार म्हणाले की, मला सांगितले गेले की काही लोकांनी शिफारस केली होती, पण पोलिस आयुक्तांनी शस्त्र परवाना दिला नाही आणि मी त्यांचे कौतुकच केले. कारण कायदा आणि सुव्यवस्था टिकवून ठेवणे हे सगळ्यांचे कर्तव्य आहे. पुण्यातील असो, बाहेरच्या महाराष्ट्रातील असो, गुन्हेगाराला वाचवण्याचा प्रयत्न कुणी करू नये. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पंतप्रधानांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेतही हा विषय आला होता आणि सर्वांची भूमिका एकच होती, दोषींवर कोणतीही माया नाही.

राजकीय हस्तक्षेप सहन केला जाणार नाही

अजित पवारांनी ठाम भूमिका घेत सांगितले की, राजकीय नेत्यांच्या दबावाखाली पोलिसांनी निर्णय घेऊ नयेत. कायदा मोडणा-यांवर कारवाई करायची, एवढेच काम आहे. शिफारस कोणाची आहे हे गौण आहे. ते पुढे म्हणाले की, गेल्या ३२ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत मी नेहमी सांगतो, एखाद्या



फाईलवर माझी शिफारस असली, तरी जर ती वस्तुस्थितीला धरून नसेल, तर सचिव किंवा पोलिसांनी लक्षात आणून द्यावे. जर तरीही चुकीच्या शिफारशीवर निर्णय झाला, तर तो मंत्री दोषी ठरेल. अजित पवारांच्या या वक्तव्यामुळे आता योगेश कदम यांच्या भूमिकेवर नवे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राजकारणात गुंडगिरीला जागा नाही नीलेश घायवळ आणि त्याच्या भावावर अनेक गुन्हे दाखल आहेत. तरीही ते राजकीय पातळीवर सक्रिय असल्याचे आरोप आहेत. यावर अजित पवार म्हणाले, राजकारण हे सेवेसाठी आहे. गुंड प्रवृत्तीच्या लोकांना यात स्थान नाही. कायदा मोडणा-यांना संरक्षण दिले जाणार नाही. महाराष्ट्रात शांतता आणि सुव्यवस्था टिकवण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. कोथरूड गोळीबारानंतर घायवळ टोळीविरोधात पोलिसांनी मोहीम सुरू केली आहे. नीलेश घायवळ सध्या परदेशात फरार असून, त्याच्या अटकेसाठी रेड कॉर्नर नोटिस जारी करण्याची मागणी होत आहे. दुसरीकडे सचिन घायवळच्या शस्त्र परवान्याबाबत गृह विभागात तपास सुरू आहे.

## सगळ्यांना हाणले नाही, तर जयंत पाटील माझे नाव नाही

पुणे : भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि त्यांच्या कुटुंबीयांविषयी अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केल्यानंतर निर्माण झालेल्या वादावर आता स्वत: जयंत पाटील यांनी मौन तोडले आहे. जयंत पाटील म्हणाले की, वेळ येईल तेव्हा आम्ही या सगळ्याचे उत्तर देऊ, तोपर्यंत वाट बघा. टप्प्यात आल्यावर करेक्ट कार्यक्रम होणारच. मी मागेही म्हटले होते की, आपले नाव ऐकले नाही असे एकही गाव नाही आणि सगळ्यांना हाणले नाही तर जयंत पाटील माझे नाव नाही. त्यांच्या या वक्तव्यानंतर उपस्थित कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

त्यांच्या या भाषणातून त्यांनी पडळकरांना थेट नाव न घेता इशारा दिला आणि आपल्या शांततेचा अर्थ भीती नसल्याचे स्पष्ट केले. पाटील यांच्या या भाषणानंतर राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना ऊत आला आहे.

## बोगस दिव्यांग प्रमाणपत्र लाभार्थी अधिकारी-कर्मचा-यांकडून वसुली सुरु

पुणे : दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेऊन शासकीय सेवेत काम करणा-या अधिकारी, कर्मचा-यांच्या दिव्यांगत्व प्रमाणपत्राबाबत राज्य सरकारच्या दिव्यांग कल्याण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एखाद्या दिव्यांग अधिकारी, कर्मचा-याच्या दिव्यांगत्वाबाबत साशंकता असल्यास संबंधिताचे दिव्यांगत्व, दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या पडताळणीचे अधिकार नियुक्ती प्राधिका-यास देण्यात आले असून, चुकीचे किंवा बोगस दिव्यांगत्व प्रमाणपत्र आढळल्यास संबंधिताविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करून त्यांनी घेतलेल्या लाभाची वसुली करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दिव्यांग कल्याण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६मधील कलम ३४ अन्वये लाक्षणिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना शासन सेवेत प्रवेशासाठी (सरळसेवा) दिव्यांगत्वाच्या आधारे निश्चित केलेल्या पाच गटांपैकी गट अ, ब, क साठी प्रत्येकी १ टक्के, गट ड, गट ईसाठी १ टक्के या प्रमाणे ४ टक्के आरक्षण आहे. सरळसेवा भरतीमध्ये लाक्षणिक दिव्यांगत्व असलेल्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदांच्या ४ टक्के पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात आली आहेत.

शासकीय रुग्णालयातून मिळालेल्या अन्य वैद्यकीय, दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या आधारे दिव्यांगांसाठीच्या सवलती, योजनांचा लाभ घेणा-या व्यक्तींनी एका वर्षात नवीन दिव्यांगत्व प्रमाणपत्र, वैश्विक ओळखपत्र प्राप्त करून घेणे अनिवार्य करण्यात आले आहेत. ही मुदत २६ जून २०२५ रोजी संपुष्टात आली आहे. या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व आस्थापना, विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख, स्वायत्त संस्था यांना त्यांच्या आस्थापनेवर दिव्यांग आरक्षणाअंतर्गत सेवेतील अधिकारी, कर्मचा-यांबाबत कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले आहेत.

काय आहेत नियम?

– राज्य शासनामार्फत विविध शासकीय, निमशासकीय, प्राधिकरणे, संस्थांमध्ये पदभरतीसाठी अर्ज घेताना दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित जागांसाठी संबंधित दिव्यांग व्यक्तींच्या वैश्विक ओळखपत्राचा क्रमांक नोंदवणे, प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे.

## जागतिक दर्जाचे 'कन्व्हेन्शन सेंटर' नागपुरात उभारण्यात येणार



मुंबई : नागपुरात सर्व सोयी सुविधायुक्त जागतिक दर्जाचे 'कन्व्हेन्शन सेंटर' उभारण्यात येणार आहे. याबाबत स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसमवेत वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सामंजस्य करार करण्यात आला. नागपूरला उभारण्यात येणारे 'कन्व्हेन्शन सेंटर' साठी निवडण्यात येणारी जागा सर्व परिवहन सेवांनी उत्तमरित्या जोडलेली असावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

यावेळी स्पेनचे भारतातील राजदूत जुआन अँटेनियो, फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पायोनियर एक्झिबिशन अँड कॉन्व्हेन्शन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश अरोरा आणि उपाध्यक्ष जीत अरोरा, नागपूर जिल्हाधिकारी विपिन इटनकर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नागपुरात प्रस्तावित असलेले कन्व्हेन्शन सेंटर केवळ प्रदर्शने, कार्यक्रम आदींसाठी उपयोगात येणारे नसावे, तर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी हक्काचे व्यासपीठ असावे. नागपूरचा इतिहास 'कन्व्हेन्शन सेंटर' च्या माध्यमातून येथे आलेल्या प्रत्येकाला कळावा, अशा पद्धतीने कन्व्हेन्शन सेंटरची अंतर्गत रचना असावी. हे सेंटर अत्यंत आकर्षक, आधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त आणि पर्यावरण पूरक वास्तूचे मूर्तिमंत उदाहरण ठरावे.

मुंबई दक्षिण आशियाचे 'पावर हाऊस' : स्पेन स्पेनचे राजदूत म्हणाले, भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे प्रधानमंत्री पेड्रो सांचेझ यांच्यात चांगले संबंध आहेत. यामुळे दोन्ही देशातील द्विपक्षीय संबंध आणखी मजबूत होत आहे. भारत कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सामान्य नागरिकाच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणत असून याची दखल जगाने घेतली आहे. मुंबई हे भारताचेच नव्हे, तर दक्षिण आशियाचे 'पावर हाऊस' बनत आहे.

## विलास साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख

### यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजीत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद, १५ इनफिल्डरचे केले पुजन

लातूर / प्रतिनिधी :– लातूर तालुक्यातील निवळी येथील विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त साखर कारखान्याच्या वतीने शुक्रवार दि. १० ऑक्टोबर रोजी दुपारी कारखाना स्थळी आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर आयोजीत करण्यात आले होते, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच १५ इनफिल्डरचे व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे व सर्व संचालकांच्या उपस्थितीत पुजन करण्यात आले.







विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त दुपारी कारखाना स्थळी आरोग्य शिबीर घेण्यात आले. या शिबीरात आरोग्य तपासणी करुन पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर १५ इनफिल्डरचे व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे व सर्व संचालकांच्या उपस्थितीत पुजन करण्यात आले. या आरोग्य शिबीरात डॉ. अभिजीत यादव, डॉ. बजरंग खडबडे, डॉ.शंकर साबळे, डॉ.विजय कसबे, डॉ. जावेद तांबोळी डॉ. कैफ काझी, वैदयकीय अधिकारी डॉ.नंदकीशोर निकते यांनी तपासणी व आरोग्य उपचार केले. यावेळी त्यांना बालाजी कदम, सुनील यादव, काशीनाथ भातमोडे, अतिश मस्के, पंकज किनगावकर, स्वप्नील आव्हाड यांनी मदत केली. या शिबीराचा २०० कर्मचारी यांनी लाभ घेतला. या कार्यक्रमास कारखान्याचे व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील संचालक सर्वश्री अमृत हरिश्चंद्र जाधव, अनंत व्यंकटराव बारबोले, नरसिंग दगडू बुलबुले, गोवर्धन मोहनराव मोरे, रणजित राजेसाहेब पाटील, रसूल दिलदार पटेल, तात्यासाहेब छत्तू पालकर, हणमंत नागनाथराव पवार, रामराव विश्वनाथ साळुंके, दीपक अर्जुन बनसोडे, शाम भारत बरुरे, सुभाष खंडेराव माने, रमेश देशमुख यांच्यासह सभासद, ठेकेदार, अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते. यावेळी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांना वाढदिवसानिमित्त सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी स्मारकाचे काम तात्काळ चालू करण्याची व्ही एस पँथर्स ची मनपा आयुक्त यांच्याकडे मागणी

लातूर :– व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिका आयुक्त मानसी मीना मॅडम यांची भेट घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्कमधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी स्मारकाचे काम सुरू करण्याची मागणी करण्यात आला. गेल्या दोन महिन्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून निवेदन देण्यात आले होते त्यांनी आश्वासन दिले होते लवकरच काम सुरू करू त्यानंतर पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना भेटून निवेदन देऊन याबाबत विचारणा करण्यात आली त्यावेळी त्यांनी देखील लवकरात लवकर काम सुरू होईल असे सांगितले ,पण कुठलेच



काम सुरू झालेले नाही त्यासाठी आज विनोद भाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिका आयुक्त यांची भेट घेऊन तात्काळ काम सुरू करण्याची मागणी करण्यात आली सरकार आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावत असल्याचे जाणवत आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामाबाबत महायुती सरकार उदासीन दिसत आहे हे आंबेडकरी जनता सहन करणार नाही तात्काळ काम सुरू नाही झाले तर व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा विनोद भाऊ खटके यांनी दिला. यावेळी संघटनेचे संपर्कप्रमुख आनंद जाधव विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे युनूस शेख जिल्हा संघटक सुरज सूर्यवंशी, ऑटो युनियन शहराध्यक्ष शाहरुख मणियार राजू खान सह महिला पदाधिकारी उपस्थित होते.

## सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा लातूर जिल्हा दौरा

लातूर :– राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट हे शनिवार, ११ ऑक्टोबर २०२५ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सामाजिक न्याय मंत्री श्री. शिरसाट यांचे ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता लातूर विमानतळावर आगमन होईल. सकाळी ११.४५ वाजता लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे त्यांचे आगमन होईल व सत्कार. दुपारी १२ वाजता ते मोटारीने अहमदपूरकडे प्रयाण करतील. दुपारी १२.४५ वाजता अहमदपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सुशोभिकरण कामाची पाहणी करतील. दुपारी १



वाजता अहमदपूर तालुक्यातील काळेगावकडे प्रयाण करतील. दुपारी १.१५ वाजता काळेगाव येथील तक्षशीला बुद्ध विहार येथे वर्षावास सोहळा व तथागत गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी २.१५ वाजता अहमदपूरकडे प्रयाण करतील. दुपारी २.३० वाजता अहमदपूर येथे गोपीनाथराव जोंधळे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देतील. दुपरी २.४५ वाजता माजी नगरसेवक डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देतील. दुपारी ३ वाजता अहमदपूर येथून लातूरकडे प्रयाण करतील. दुपारी ३.४५ वाजता लातूर येथून विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## 'पीओके'मधील कोंडी कशी फुटणार?

'पीओके'मधील सध्या सुरू असलेला जनआंदोलनाचा सुवर्णसंदर्भ समजून घेणे अत्यावश्यक आहे. या लेखात आपण त्या आंदोलनाची कारणे, इतिहास, परिणाम आणि भवितव्याची शक्यता यांचा आढावा घेणार आहोत. 'पीओके'मधील सार्वजनिक जीवनातील अडचणी आणि त्या सोडविण्यासाठी आवश्यक राजकीय व आंतरराष्ट्रीय उपाययोजनांची गरज आहे.

प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर पाकिस्तान या दक्षिण आशियातील देशाचे वर्णन समस्यांनी ग्रासलेला देश, असे करावे लागेल. बलुचिस्तानमधील 'बीएलए' ही संघटना स्वतंत्र बलुची राज्याच्या स्थापनेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत असताना आता पाकच्या राजकारणात 'पीओके'चे नवे वादळ उद्भवले आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये अवामी कृती दलाने जनअसंतोषाचा प्रक्षोभ प्रकट केला आहे. गेल्या दोन दिवसांपासून पाकव्याप्त काश्मीरचा प्रदेश असंतोषाने धुमसतो आहे. त्याची कारणमीमांसा हे प्रस्तुत लेखाचे प्रयोजन आहे.

खरे तर, संपूर्ण जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, हे लक्षात घेऊन पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरवरचा हक्क सोडून देणे आवश्यक होते; पण तसे घडले नाही; पण आज साडेसात दशकांनंतर याच 'पीओके'मधील जनता असंतोषाने उद्विग्न झाली आहे आणि पाकिस्तानच्या प्रशासनाला पूर्णपणे कंटाळली आहे. 'पीओके'मधील असंतोषाची कारणमीमांसा केली असता असे दिसते की, या प्रदेशातील लोकांच्या मूलभूत समस्येकडे पाक प्रशासनाने कधीच लक्ष दिले नाही. त्यांना सतत दुय्यम वागणूक दिली. त्यांचे शोषण केले आणि त्यांना अगदी मूलभूत अधिकारांपासूनसुद्धा वंचित ठेवले. त्याचा परिणाम म्हणजे, 'पीओके'मध्ये नागरिकांनी विशेषतः युवकांनी स्वीकारलेला जनआंदोलनाचा मार्ग होय.

गुंतागुंतीची कारणे पाकव्याप्त काश्मीरमध्ये जनतेला जसे प्रतिनिधित्व दिले पाहिजे तसे दिले जात नाही. अव्वाच्या सव्वा कर वसूल केला जातो; पण त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा, ऊर्जा, आरोग्य या मूलभूत प्रश्नांकडे मात्र डोळे झाकले जातात. त्यामुळे पाकिस्तानला कर देऊन उपयोग काय? आपल्याला मूलभूत सोयीसुविधा मिळत नसतील, तर तेथे राहून उपयोग काय, असे प्रश्न तेथील युवकांच्या मनात निर्माण झाले. विशेषतः, गेल्या आठवड्यात इंटरनेट सुविधा बंद केल्यामुळे युवकवर्ग संतापला आणि तो रस्त्यावर उतरला. त्यांनी पाक प्रशासनाविरुद्ध जोरदार निदर्शने केली. त्यामध्ये एकाला प्राणास मुकावे लागले. सातपेक्षा अधिक लोक जखमी झाले. अशावेळी पाकिस्तानमधील शाहबाज शरीफ यांचे सरकार नमते घेण्याऐवजी लोकांवर वरवंटा फिरवीत आहे आणि या दडपशाहीमुळे तेथील तरुणवर्ग मोठ्या प्रमाणावर आंदोलनात उतरला आहे.

पाकव्याप्त काश्मीरचा प्रदेश निसर्गदृष्ट्या संपन्न आहे. 'पीओके'सह बाल्टिस्तान आणि गिलगिट या प्रदेशांचा समावेश होतो. गिलगिट हे हिमालयातील एक सर्वोच्च शिखर असून, येथून जगाच्या कुठल्याही भागावर टेहळणी करता येते, नजर ठेवता येते. त्यामुळे भूराजनैतिक दृष्टीने याला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे अमेरिकेने पाकिस्तानशी गोडीगुलाबी करून तेथे लष्करी तळ उभारला आहे. आता 'पीओके'मधील जनआंदोलनाचा प्रभाव कसा व किती व्यापक आहे, यावर 'पीओके'चे भवितव्य अवलंबून आहे. शिक्षणाचा अभाव, आरोग्य सुविधांकडे दुर्लक्ष, वाढती महागाई आणि जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, यामुळे 'पीओके'मधील सामान्य माणूस पाक प्रशासनाला वैतागला आहे आणि त्याला आता पाकिस्तानपासून मुक्तता हवी आहे. हाच केंद्रबिंदू घेऊन अवामी लीग ॲक्शन कमिटीने जनतेचा आवाज बुलंद केला आहे आणि आपल्या समस्यांचे प्राधान्यक्रम मांडले आहेत. खरे तर, तेथील जनतेने आता पाकिस्तानचा हात सोडून भारतात विलीन होण्याची मागणी केली पाहिजे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा रक्तपात न होता तेथे 'सायलेंट रेवोल्युशन' होऊ शकेल. खरे तर, 'पीओके'मधील जनतेला स्वयंनिर्णयाचा अधिकार आहे. त्यांना बळेबळेच पाकिस्तानमध्ये ठेवण्यात काहीही अर्थ नाही. त्यांची इच्छा जम्मू-काश्मीरमध्ये म्हणजेच भारतात विलीन व्हायची असेल, तर पाकिस्तानने त्याला संमती दिली पाहिजे. भारताची भूमिका भारताला असे वाटते की, 'पीओके'मधील जनताच पाकविरोधी उठाव करेल आणि जनआंदोलनाचा रेटा एवढा जबरदस्त आहे की, लोकच 'पीओके'मुक्त करतील आणि सुशासनासाठी भारतात विलीन होण्याची इच्छा प्रकट करतील. त्यामुळे त्यांच्या विसकटलेल्या जीवनाची घडी पुन्हा बसू शकेल आणि अडकून पडलेले विकासाचे प्रवाहसुद्धा खुले होऊ शकतील. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये ज्या पद्धतीने परिस्थिती सुधारत आहे, ते पाहून पाकिस्तानातील अनागोंदी आणि बजबजपुरीला कंटाळलेल्या 'पीओके'मधील जनतेलासुद्धा आपण भारताच्या छायेत यावे, असे वाटणे साहजिक आहे. त्यामुळे अवामी लीग ॲक्शन कमिटीने आता संयुक्त राष्ट्र संस्थेकडे अशी मागणी केली पाहिजे की, आम्हाला भारतात विलीन होण्यासाठी परवानगी द्यावी. अवामी कृती संघटनेने ठाम भूमिका घेतली पाहिजे. आम्हाला पाकसोबत राहायचे नाही, आम्ही जम्मू-काश्मीरच्या जनतेबरोबर राहू, आम्हाला या जाचातून व छळातून मुक्त करण्यासाठी भारतात जायचे आहे, अशी स्पष्ट भूमिका घेतली, तरच 'पीओके'मधील जनतेचा छळ संपू शकेल. वेळोवेळी आंदोलन झाले की, पाकिस्तान थोडीफार सुधारणांची मलमपट्टी करते. मधाचे बोट दाखवते. वेळ मारून नेली जाते; पण प्रश्न मात्र आहे तसाच राहतो. त्यामुळे आता आंदोलकांनी माघार न घेता पाकविरोधात आंतरराष्ट्रीय दबाव निर्माण केला पाहिजे. तसे झाले तरच 'पीओके'चा प्रश्न सुटेल. या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की, 'पीओके'मधील जनआंदोलन हे पाकविरोधी आहे. ते भारताच्या दृष्टीने पाहता, या जनआंदोलनाची दिशा सुशासनाकडे आहे. पाक प्रशासनाला कंटाळलेले 'पीओके'मधील लोक आता भारतात विलीन होण्यासाठी तयार आहेत; पण यासाठी त्यांनीच कुठे राहायचे, हा निर्णय घेतला पाहिजे.

# धम्मचक्र प्रवर्तन दिन : १४ ऑक्टोबरलाच कां साजरा करावा?

शतकानुशतकांची गुलामगिरी, शोषण, जातिभेद यांना छेद देत नवा युगारंभ केला. हाच तो क्षण होता ज्याने दलित, शोषित, वंचित समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. त्यामुळे १४ ऑक्टोबर हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नसून, तो आशेचा, स्वाभिमानाचा आणि क्रांतीचा दिवस आहे. धम्मचक्र प्रवर्तनाचा सामाजिक संदेश, धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे अन्यायाविरुद्ध बंड, पण हिंसेशिवाय. ते माणसाला माणसासमान जगण्याची शिकवण देते. बौद्ध धर्म हा स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा अधिष्ठान आहे ज्यात कोणतीही जात नाही, उच्च-नीचपणाचा भेद नाही. त्यामुळे धम्म स्वीकारणे म्हणजे आत्मसन्मान स्वीकारणे. १४ ऑक्टोबर १९५६ हा दिवस भारतीय इतिहासातील एक क्रांतिकारी वळण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.

बाबासाहेबांनी सारनाथच्या धम्मचक्र फिरवणाऱ्या बुद्धांच्या परंपरेशी संगती साधत, आश्विन पौर्णिमेला दीक्षाभूमीवर धर्मचक्र फिरवले. त्या एका कृतीने त्यांनी पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या दास्याच्या साखळ्या तुटल्या आणि समतेच्या धर्माचा नवा प्रवास सुरू झाला. भारताच्या दीर्घ सामाजिक इतिहासात जातिव्यवस्था ही जखम होती. शेकडो वर्षे दलित समाजाला अपमान, अन्याय, अस्पृश्यतेच्या यातना सोसाव्या लागल्या. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अभ्यास, संघर्ष आणि त्यागातून या व्यवस्थेविरुद्ध आवाज उचलला. अखेर त्यांनी ठामपणे जाहीर केले की, मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही आणि आपल्या शब्दाला जागत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन लाखो जनतेला नवजीवन दिले. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे. या दिवशी बाबासाहेबांनी जे धाडस केले, त्यातून दलित समाजाने आपली गुलाम मानसिकता झटकून टाकली. हा दिवस म्हणजे स्वाभिमान दिन आहे.

काहींना प्रश्न पडतो की, हा दिवस १४ ऑक्टोबरलाच कां साजरा करावा? कारण तो फक्त बाबासाहेबांचा व्यक्तिगत निर्णय नव्हता; तो संपूर्ण समाजाचा नवजीवनाचा क्षण होता. लाखो लोकांनी त्यादिवशीच आपले भविष्य बदलले. एकंदरीत हा दिवस म्हणजे धम्मक्रांतीचा जन्मदिन आहे. हजारो वर्षे अस्पृश्यतेच्या दाहात जळणाऱ्या समाजाने पहिल्यांदा मी ही माणूस आहे असे ठामपणे जाणले, तो दिवस म्हणजे म्हणूनच १४ ऑक्टोबरला विसरून चालणार नाही. नागपूरची भूमी, लाखोंचा सागर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तेजोमय संकल्प! तो फक्त एक दिवस नव्हता; तो पिढ्यान् पिढ्यांच्या अश्रूंचा शेवट आणि मानवतेच्या नव्या पहाटेचा उदय होता. या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र आलेल्या जनसमुदायाची अवस्था डोळ्यांसमोर आणली, तर अंगावर शहारे येतात. शतकानुशतकांच्या अन्यायाचे ओझे त्या दिवशी हलके झाले. आता आपणही माणूस आहोत, समान हक्काचे आहोत ही भावना आणि भावनिक दृष्टीकोन त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती. तो केवळ धर्मांतर नव्हता; ती मानवी स्वातंत्र्याची घोषणा होती. आज आपल्याला १४ ऑक्टोबरचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. कारण जातिव्यवस्था आजही वेगवेगळ्या स्वरूपात दिसते. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या शिवाय मानवतेला अर्थ नाही. तसेच, हा दिवस आपल्याला शिकवतो की खरी ताकद ही संघटनेत, शिक्षणात आणि विचारांत आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिन केवळ स्मरणोत्सव नसून तो आहे सतत जागवणारा चेतावणीचा नगारा. विषमता, दारिद्र्य, अन्याय अजूनही समाजात आहे, अशा परिस्थितीत आजच्या पिढीसाठी १४ ऑक्टोबरचा संदेश असा आहे की, समता, न्याय आणि करुणा अधिक सामर्थ्याने पसरवण्याची गरज आहे.

हा फक्त एका धर्मांतराचा दिवस नाही. तो भारतीय समाजाच्या पुनर्जन्माचा दिवस आहे. ज्यांनी अस्पृश्यतेच्या अंधःकारातून प्रकाशाकडे वाटचाल केली, त्यांचा हा उत्सव आहे. म्हणूनच आपण हा दिवस केवळ साजरा करावा असे नाही, तर जीवनपद्धतीत उतरवावा. तो होता मनुष्यत्वाचा उत्सव, तो होता अस्मितेचा पुनर्जन्म, तो होता न्याय, समता आणि बंधुत्वाच्या नव्या वाटचालीचा आरंभ. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हते, तर मानसिक गुलामीतून मुक्त होण्याचा शपथविधी होता. त्या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र जमलेला जनसागर पाहताना असे वाटले. जणू अंधाराने त्रस्त झालेले लाखो तारे एका सूर्याच्या प्रकाशाने उजळून निघाले. लोकांच्या डोळ्यांत अश्रू होते, पण ते दु:खाचे नव्हते; ते होते आनंदमुक्तीचे अश्रू. शतकानुशतके अपमान सहन केलेल्या समाजाने पहिल्यांदाच उंच मान करून मोकळा श्वास घेतला.

बुध्दधर्मात जनतेला हवा असणारा ईश्वर नाही, आत्मा नाही, चमत्कार नाहीत, त्यात दु:खावर भर आहे, ऐहिकांविषयी अनास्था आहे, ब्राम्हणी धर्मातील विषमतेची आणि अनाचारांची बाधाही त्याला झालेली आहे, शिवाय भारताबाहेर त्याचा बेसुमार जलद गतीने प्रसार झाल्यामुळे भारताबाहेरील अनेक गोष्टी बौध्दधर्म संघटनेत प्रभावी ठरल्या आहेत, इत्यादी अनेक गोष्टींचा फायदा ब्राम्हणीधर्माने पध्दतशीरपणे घेतला. अशा रीतीने एका बाजूने बौध्दाला आत्मसात करणे आणि दुसऱ्या बाजूने त्याचे उच्चाटन करणे, अशा दुहेरी-दुधारी शास्त्रानिशी बौध्दधर्माशी ब्राम्हणी नेत्यांनी सामना केला. ही खरी शोकांतीका म्हणावी लागेल. डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्म स्वीकारला, धर्मचक्र प्रवर्तन केले पण त्यातून आजच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार पुन्हा-पुन्हा केला. तो विचार चालू ठेवायला, त्यातून आजच्या प्रश्नांची उत्तरे शोधायला ते स्वत: राहिले नाहीत, ही एक खरोखरच अत्यंत दुर्दैवी घटना समजली पाहिजे.

१४ ऑक्टोबर हा दिवस निव्वळ तारखेतला आकडा नाही. तो आहे, गुलामीतून मुक्तीचा विजयदिवस, मानवतेच्या धर्माचा पहिला जयघोष आणि आगामी पिढ्यांना दिशा देणारा दीपस्तंभ. म्हणूनच धम्मचक्र प्रवर्तन दिन आपण १४ ऑक्टोबरलाच साजरा करतो. कारण तो दिवस म्हणजे बाबासाहेबांनी दिलेला समतेचा अमर दीप, जो कधीही विझणार नाही. या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र येणारे लाखो अनुयायी हा केवळ उत्सव साजरा करत नाहीत; तर ते आपली माती, आपला अभिमान, आपली क्रांती पुन्हा अनुभवतात. म्हणूनच १४ ऑक्टोबरला 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' साजरा करणे म्हणजे बाबासाहेबांच्या क्रांतीला अभिवादन करणे आणि आपल्या भविष्याचा मार्ग ठरवणे होय. सर्वांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या मंगलमय शुभेच्छा!


**********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# बाबा के बच्चो के बैगेर इस देश का शासन चलने नही दुंगा..! मेरे सपनो का भारत सम्राट अशोक का भारत..!

बहुजन नायक मान्यवर : कांशीरामजी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अहोरात्र मेहनत करून त्याग, बलिदान देऊन ज्यांनी समाज जागृती केली व खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या सर्वच गोष्टी अंगीकारून भारतामध्ये बहुजनांचे राज्य प्रस्थापित होऊ शकते हा आशावाद निर्माण केला, फुले-शाहू-आंबेडकर या महापुरुषांच्या आंदोलनामुळे जो कर्मचारी वर्ग निर्माण झाला तो फक्त स्वतःच्या संसारात, गाडी माडी मध्ये व्यस्थ झाला. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले -मुझे पढे लिखे लोगोने धोका दिया..! हा बाबासाहेबांचा आरोप खोडून काढण्यासाठी ज्यांनी समाजातील कर्मचारी वर्गाला एकत्र करून पे बॅक टू सोसायटी व त्या मधून स्वाभिमानी राजकारण उभे केले व ते राजकारण उभे करताना रणनीती म्हणून अनेक राजकीय पक्षांना वापरून स्वतःची पार्टी मोठी केली. देशात कांशीरामजी एकमेव असे व्यक्ती होते ज्यांनी सर्वच राजकीय पक्षांना झुकवले व त्यांना बहुजन समाजासाठी वापरून सुद्धा घेतले व स्वतःची ताकत एवढी वाढवली की, त्यांना विचारात घेतल्या शिवाय देशात राजकारण होतच नव्हते. बहुजनांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी नेहमी वेगळी रणनीती वापरून आपलं काम करून घेत. अब इस देश का शासन बॅलेटसे नहीतो बुलेटसे अपनी सरकार लायेंगे..! भारतीय राजकारणात, समाजकारणात कायमचे आपले स्थान निर्माण करणारे, बाबासाहेबांचे खरे अनुयायी, बाबासाहेबांचे वैचारिक वारसदार, बहुजन नायक मान्यवर कांशीरामजी यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन.

कांशी तेरी नेक कमाई
तुने सोती कौम जगाई..!




आजही आपल्यातील काही बांडगुळाना असे वाटते मी माझ्या क्षमतेमुळे नोकरीला लागलो आहे तर तसे नसून बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर या बहुजन महापुरुषांच्या आंदोलनामुळे लागलेले अहात याची जाणीव करून द्यावी लागते, याच काही बांडगुळांना आंबेडकरी आंदोलनाची, समाजकार्याची, राजकारणाची लाज वाटते किंवा नेहमी नकारात्मक पद्धतीने या आंदोलनाकडे बघितलं जात' किंवा जो तरुण या आंदोलनात जोडला जाऊ शकतो त्याला आंबेडकरी चळवळीबाबत नेहमी हिनवले जाते नकारात्मक पद्धतीने मांडणी केली जाते पण अशा बांडगुळांवर जेव्हा इतर वर्गाकडून चुकीची वागणूक दिली जाते किंवा सरकारी नोकरीवर असताना तिच्या वर गदा येते किंवा कुठलीही समस्या आली की मात्र तो आंबेडकरी समाजातील, राजकारणातील तरुण त्यांना हवाहवासा वाटतो तेव्हा, समाजाचीही आठवण येते. आशा काही तकलादू आणि संधी साधू लोकांमुळेच या चळवळीची दशा झालेली आपणांस दिसून येते. घरी बसून सल्ले देणारे आणि रणांगणात चळवळीसाठी आपलं प्राण पणाला लावून लढा लढणारे यात खुपच मोठा फरक आपणांस दिसून येतो. तसेच काही स्वाभिमानी कर्मचारी आहेत ज्याच्या जीवावर आज पर्यंत आंदोलन आणि चळवळी उभ्या राहिल्या. म्हणून आंदोलनामध्ये कर्मचाऱ्यांना घेऊन त्यांच्या जीवावर स्वाभिमानी राजकारण करणे ही काळाची गरज आहे तसेच अन्याया विरुद्ध पेटून उठने आपला आवाज संसदेत असो किंवा रस्त्यावर सरकार दोन्ही ठिकाणी झुकवले पाहिजे..! आशावादी राहूनच सर्वच क्षेत्रात समाजाची व आपली प्रगती केली हीच अपेक्षा.

जय भीम जय शिवराय जय कांशीराम जय संविधान जय भारत.

**********

ॲड. सुमित साबळे
( उपाध्यक्ष, महाराष्ट्र,
आजाद समाज पार्टी )

# वीजउत्पादनातील कोळशाचा वाटा

विकसनशील देशातील विजेची गरज पूर्ण करण्याचे आव्हान पेलताना कोळसा खाणी आणि त्यापासून निर्माण होणार्या विजेचे काय करायचे? असा प्रश्न निर्माण होतो.

जागतिक तापमान दीड अंशापेक्षा कमी ठेवण्यासाठी जगाचे कार्बन बजेट मोठ्या प्रमाणात खर्च केले जात आहे. हा एक प्रतिबंधात्मक उपाय असून तो जगाला ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटातून वाचवणारा आहे. यास्थितीत सर्वांचे हित साधणार्या तोडग्यावर काम करायला हवे. कोळसा जमिनीतच राहू द्या, असे सांगितले जाते. याचा अर्थ वीज तयार करण्यासाठी कोळशाचा वापर थांबवायला हवा. कारण कोळशाचा वापर वातावरणात ग्रीनहाउस गॅसचे प्रमाण वाढवणारा आहे.



पण ऊर्जेची टंचाई असताना हा उपाय कितपत परिणामकारक ठरेल? दुसरी गोष्ट म्हणजे, अनेक वर्षांपासून जगाला कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा सल्ला देणारे देशच आज वीजनिर्मितीसाठी कोळशाचा वापर करत आहेत. या देशांमुळे झालेले उत्सर्जन अजूनही वातावरणात आहे आणि त्यात कार्बन डायऑक्साइडचा देखील समावेश आहे. आज हे देश पर्यायी जीवाश्म इंधन, नैसर्गिक गॅसचा वापर करत असले तरी त्यापासूनही कमी प्रमाणात का होईना ग्रीनहाउस गॅस ऊत्सर्जन होतच आहे.

युरोपियन महासंघाने अलीकडेच अमेरिकेसमवेत एक ऐतिहासिक व्यापारी करार केला असून त्यानुसार तीन वर्षांसाठी दरवर्षी २५० अब्ज डॉलरची वीज उत्पादने म्हणजे नैसर्गिक गॅस, कच्चे तेल आणि कोळशाची आयात करण्याची हमी दिली आहे. याचाच अर्थ युरोपीय संघ देखील वीज निर्मितीसाठी जीवाश्म इंधन वापरण्याबाबत सकारात्मक असल्याचे दिसून येते. वास्तविक, ही भूमिका त्याच्या हरित ऊर्जा योजनेशी पूर्णतः विसंगत स्वरुपाची आहे. अशा स्थितीत भारतासारख्या देशांनी काय करायला हवे?

एकीकडे वीजटंचाई दूर करण्याबरोबरच परवडणार्या मार्गाचा देखील शोध घेण्याची आणि त्या माध्यमातून विकास करण्याची गरज आहे. प्रसंगी काही वेळा कठीण स्थितीचा सामना करावा लागू शकतो. परंतु आपण 'क्लिन एनर्जी'च्या बळावर विकास करण्याच्या दृष्टीने वाटचाल करताना कोळशावरचे अवलंबित्व सोडायला हवे का, याचाही विचार करायला हवा. वास्तविक, सुरुवातीच्या काळात भारताने जुन्या आणि नवीन ऊर्जा स्त्रोतांना संतुलित करणार्या मार्गाचा शोध घ्यायला हवा.

भारत सरकारचे वीज निर्मितीचे धोरण योग्य असून ते पूर्णपणे कोळसा बंद करण्याऐवजी कमी करण्यावर आधारित आहे. २०३० पर्यंत विजेची मागणी दुप्पट होणार आहे आणि ही वाढीव गरज प्रामुख्याने पवन ऊर्जा, सौर ऊर्जा यांसारख्या क्लिन एनर्जी स्त्रोतातून भागविली जाईल. याचे कारण या मागणीपैकी केवळ ५० टक्के वीज निर्मिती कोळसा करू शकणार आहे.

हा कळीचा मुद्दा असून त्याचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करायला हवा. यानिमित्ताने कोळशावर आधारित वीज प्रकल्पातून ग्रीनहाउस गॅस उत्सर्जन कमी करण्यासाठी आणखी काय करता येईल हे देखील पाहिले पाहिजे. पण कोळसा लवकरच इतिहासजमा होणार आहे. त्यामुळे आपण आणखी व्यावहारिक व्हायला हवे. आपल्याला कोणत्याही स्थितीत सर्वच क्षेत्रातील उत्सर्जन कमी करावे लागेल.

स्थानिक वातावरणाची गुणवत्ता राखण्यासाठी प्रयत्न करणेही तितकेच गरजेचे आहे. तरच हवामानातील विषाक्त पदार्थ कमी होतील आणि आपले जगणे सुखकर होईल. हे विषारी घटक आरोग्याच्या कुरबुरी वाढविण्याचे काम करतात. आपण दोन्ही स्तरांवर काम करणारी रणनीती स्वीकारली तर जागतिक पातळीवर हवामानाची स्थिती चांगली करू शकू.

अर्थात ही बाब उल्लेखनीय यश मिळवणारी आहे. भारतात कोळसा आधारित वीज प्रकल्पाला कार्बनमुक्त करण्यासंदर्भात आराखड्याच्या अहवालात दोन स्तरावर काम करण्याचे नियोजन केले आहे. त्याचे विश्लेषण केले तर देशात औष्णिक वीज प्रकल्पांना कार्बनमुक्त करायचे असेल व तशी रणनीती आखली जात असेल तर यामुळे पोलाद, सिमेंट क्षेत्रातदेखील उत्सर्जन कमी होऊ शकते.

या आराखड्यातील पहिले पाऊल म्हणजे सध्याच्या प्रकल्पाला चांगल्या श्रेणीतील प्रणाली बसविणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, महत्त्वाच्या तंत्रज्ञानावर आधारित एकूण वीज निर्मिती प्रकल्पातील सुमारे ८५ टक्के प्रकल्पांना चांगली कामगिरी करणार्या जसे टाटा पॉवरची ४० वर्षे जुनी ट्रॉम्बे कंपनी, तेलंगण राज्य वीज उत्पादन महामंडळाची कोतागुडम औष्णिक वीज प्रकल्प किंवा जेएसडब्लूचे तोरनगल्लू प्रकल्पाच्या उत्सर्जन निकषावर पोचायला हवे. त्याचा अंगीकार केल्यास एकूण उत्सर्जनात सुधारणा होऊ शकते.

दुसरे पाऊल म्हणजे कच्च्या मालाच्या रुपातून कोळशाऐवजी पर्यायी साधनाचा वापर करायला हवा. अनेक वीज प्रकल्प कोळशाबरोबरच बायोमासचा वापर करत आहे. पण वीस टक्के बायोमासचा वापर बंधनकारक करायला हवा, जेणेकरून व्यापक प्रमाणात कार्बन डायऑक्साइडच्या उत्सर्जनात घट होईल. पण अजूनही उत्सर्जन कमी करण्याचे ध्येय आणि स्पष्ट धोरण दिसत नाही. कमी खर्चात वीज तयार करण्याचे पर्याय असतात आणि त्यात देखभाल आणि तंत्रज्ञानावर ज्ञारसा खर्च केला जात नाही. हाच मोठा दोष असल्याने कोळसा वापरला जातो.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने धारूर तहसील कार्यालयावर विराट जण आक्रोश मोर्चा

धारूर/प्रतिनिधी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने धारूर तहसील कार्यालयावर विविध मागणीच्या अनुषंगाने विराट जण आक्रोश मोर्चा काढण्यात आला या मोर्चामध्ये वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, संबंध राज्यात अतिवृष्टी झाल्यामुळे बळीराजाचे अतोनात नुकसान झाले असून या अतिवृष्टीमध्ये शेतकऱ्यांच्या हाताशी आलेला घास हिरावला गेला आहे. या अतिवृष्टीमध्ये सोयाबीन, ऊस,कापूस, उडीद, मुग, बाजरी सह इतर पिकांचे अतोनात नुकसान झालेले आहे तर काही ठिकाणी नदीकाठच्या गावांमध्ये घरात पाणी घुसून नागरिकांच्या संसार उपयोगी वस्तूचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे, त्याचबरोबर काही शेतकऱ्यांचे जनावरासह इतर पशुधन अतिवृष्टी मध्ये वाहून गेले तर काही जनावरे व पशुधनांचा मृत्यू झालेला आहे. सध्या बळीराजा अस्मानी संकटामध्ये सापडलेला आहे शेतकऱ्यांना आता आर्थिक मदतीची अत्यंत गरज आहे. म्हणून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने धारूर तहसील कार्यालय आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चातील प्रमुख मागण्या:– राज्यात अतिवृष्टी जाहीर करा,






शेतकऱ्यांना हेक्टरी अतिवृष्टी अनुदान पन्नास हजार रुपये मदत देण्यात यावी,सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी, सध्या कशीत असलेल्या गायरान जमिनीचा गायरान धारकांना सातबारा देण्यात यावा,अनुसूचित जमाती प्रलंबित जात प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे,प्रलंबित रमाई आवास योजना व पंतप्रधान योजनेतील लाभधारकांचे हप्ते तात्काळ देण्यात यावेत,संजय गांधी व श्रावणबाळ निराधार योजनेतील लाभधारकांचे पगार वेळेवर देण्यात यावेत,धारूर तालुक्यातील अतिवृष्टीमुळे ज्या गावांचा संपर्क तुटलेला आहे त्या गावातील पुलांची बांधणी तात्काळ करण्यात यावी यासह विविध मागण्यासाठी धारूर तहसील कार्यालयावर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विराट जण आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले होते. या मोर्चाचे नेतृत्व धारूर तालुकाध्यक्ष इंजी प्रशांत उघडे यांनी केले. या मोर्चास वंचित बहुजन आघाडी बीड पूर्वचे जिल्हाध्यक्ष शैलेश भाऊ कांबळे, महासचिव मिलिंद घाडगे, युवक जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के,धर्मानंद साळवे, अंकुश जाधव, कपिल उजगरे, रानबा उजगरे, शहराध्यक्ष आकाश गायसमुद्रे,अभिजीत वाव्हळ यांच्यासहवंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांचे आंदोलनाला बहुजन समाज पार्टीचा जाहीर पाठिंबा

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक : ८/१०/२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका मधील निवृत्त उद्यान कर्मचारी यांच्या वारसांना महापालिकेत कॉन्ट्रॅक्ट मध्ये नोकऱ्या तर मिळाल्या पण त्यांना फक्त १२०००/ वेतन मिळते, किमान वेतन पद्धतीनुसार त्यांना पगार मिळत नाही. महानगरपालिकेतून मिळणारा पगार हा अधिकारी व ठेकेदार संगनमताने खातात व प्रत्यक्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना फक्त



बारा हजार रुपये पगार देतात त्यामुळे किमान वेतन नियमानुसार आमच्या वारसांना पगार मिळावा अशी मागणी घेऊन अनेक निवृत्त कर्मचारी नवी मुंबई महानगरपालिके समोर बेमुदत साखळी उपोषणाला बसलेले आहेत, त्यांना भेट देण्यासाठी बहुजन समाज पार्टी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : प्रा. दत्ता हेगडे आज उपस्थित होते. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या भावना समजावून घेतल्या व बहुजन समाज पार्टीचा आपल्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा असल्याचे जाहीर केले. व अधिकाऱ्यांशी बोलून आपणास न्याय मिळवून देऊ असेही त्यानी सांगितले, आंदोलक आठ दिवस झाले महापालिका गेट समोर बसलेले आहेत तरीही त्यांची कोणत्याच अधिकाऱ्यांनी दखल घेतलेली नाही..! याबद्दल प्राध्यापक हेगडे यांनी संताप व्यक्त केला. हा पेशवाई पद्धतीचा कारभार चालू दिला जाणार नाही अशा कडक शब्दात त्यांनी इशारा दिला, (बसपा) अबकी बार नहीं सहेगी पब्लिक का हाल, महानगरपालिका के ऊपर हाथी की चाल..!

# लातूर पोलीस दलात 'मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन' उदगीर येथे कार्यान्वित...

उदगीर/प्रतिनिधी :– भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कायद्यानुसार ७ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यांसाठी न्यायवैद्याकीय (फॉरेन्सिक) पुराव्यांचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. या सुधारणांचा एक प्रमुख भाग असलेली फिरते न्यायवैद्याक वाहन (मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन)ची सुविधा निर्माण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य असून लातूर जिल्ह्यातील मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उदगीर येथे दि. १०.१०.२०२५ रोजी मोबाईल फॅरेन्सीक व्हॅन हि आधुनिक साधन सामुग्री रसायने किट्स व २ अधिकारी व ४ कर्मचारी यांचेसह कार्यरत झाली असुन सदर वाहनाचे उद्घाटन श्री.अमोल तांबे पोलीस अधीक्षक लातुर यांचे हस्ते करण्यात आले. सदर वाहनामध्ये भौतिक, रासायनिक, जैविक व डिजीटल पुरावे गोळा करण्याकरीता विविध प्रकारचे उपकरणे, किट्स, रसायने इ साधन सामुग्री उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामुळे पोलीस



तपासास गती येवुन कामातील पारदर्शकता वाढणार आहे. सदर फॅरेन्सीक टिम हि पोलीस ठाणे उदगीर शहर, उदगीर ग्रामीण, वाढवणा, जळकोट, अहमदपुर, किनगाव, रेणापुर, चाकुर व शिरुर अनंतपाळ या पोलीस ठाण्यांना तपासात भौतिक, रासायनिक, जैविक व डिजीटल पुरावे गोळा करण्यासाठी मदत करणार आहे. यावेळी श्री गजानन भातलवंडे (उपविभागीय पोलीस अधिकारी, उदगीर) पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी, दिलीप गाडे यांच्यासह फॉरेन्सिक एक्सपर्ट तसेच दुय्यम पोलीस अधिकारी उपस्थित होते.

या गाड्यांमध्ये रक्त, डीएनए संग्रहण आणि बलात्कारासारख्या गुन्ह्यात आवश्यक पुरावे गोळा करता येणार आहेत.

वैज्ञानिक तज्ज्ञ व साहाय्यक कर्मचारी गाडीत असतील. तसेच स्फोटक पदार्थ तपासणी, सायबर गुन्ह्यांमध्ये तपासणीसाठी विशेष साधणे उपलब्ध असणार आहेत.

या गाड्या सीसीटीव्हीने सज्ज असून पोलीस यंत्रणेशी जोडलेल्या असतील. त्यामुळे संबंधित पोलीस स्टेशनला संबंधित गुन्ह्याकामी गोळा केलेल्या पुराव्यांची माहिती देता येणे शक्य होणार आहे. यामुळे पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि अचूक बनणार आहे.

पुरावे नष्ट, पुराव्यांशी छेडछाड करणाऱ्या आरोपींना शिक्षेपासून आता कुणीही वाचवू शकणार नाही. त्यामुळे गुन्हेगारांवर वचक बसणार असून गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढणार आहे.

## १३ ऑक्टोबर रोजी लातूर पंचायत समिती पंचायत समिती गणाची आरक्षण सोडत

लातूर :– राज्य निवडणूक आयोगाच्या १ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या आदेशानुसार पंचायत समिती निर्वाचक गणाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार लातूर तालुक्यातील २० पंचायत समिती निर्वाचक गणाची आरक्षण सोडत लातूर उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे यांच्या उपस्थितीत १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी १२ वाजता लातूर पंचायत समिती कार्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात होईल.

लातूर पंचायत समितीच्या एकूण निर्वाचक गणांची संख्या २० असून अनुसूचित जातीकरिता ४ गणातील आरक्षण निश्चित केले जाणार असून यापैकी २ गण महिलांसाठी आरक्षित राहतील. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी ५ गण आरक्षित राहतील, त्यापैकी ३ गण महिलांसाठी राखीव असतील. सर्वसाधारण प्रवर्गासाठी ११ गण राखीव असून त्यापैकी ६ गण महिलांसाठी राखीव असतील. तरी लातूर तालुक्यातील नागरिकांनी या सोडत बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

# केस गळून टक्कल पडेल अशी भीती वाटते? मग फॉलो करा 'या' सोप्या टिप्स, वेगाने होईल केसांची वाढ

सर्वच महिला आणि मुलींना चमकदार, सुंदर केस हवे असतात. केस मजबूत आणि मऊ दिसण्यासाठी अनेक वेगवेगळे उपाय केले जातात. पण वारंवार चुकीच्या हेअर केअर प्रॉडक्टचा वापर केल्यामुळे केसांची मूळ अतिशय कमकुवत होतात. सुंदर दिसण्यासाठी वेगवेगळ्या स्किन ट्रीटमेंट आणि हेअर ट्रीटमेंट केल्या जातात. पण कालांतराने त्वचा आणि केसांचे खूप जास्त नुकसान होते. केस अतिशय कोरडे होऊन जातात. केस मऊ आणि चमकदार दिसण्यासाठी केसांना वरून पोषण देण्याऐवजी आतून पोषण देणे सुद्धा तितकेच आवश्यक आहे. वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे केस केसांच्या मुळांवर अतिरिक्त तेल जमा होण्यास सुरुवात होते. ज्यामुळे केसांमध्ये कोंडा होणे, केस खूप जास्त गळणे किंवा केसांची वाढ थांबणे इत्यादी अनेक समस्या उद्भवतात.




तरुण वयात केसांसंबधित खूप जास्त समस्या उद्भवतात. प्रदूषण, चुकीचा आहार, ताणतणाव, हार्मोनल बदल, केमिकलयुक्त शाम्पू इत्यादी अनेक गोष्टींमुळे केस गळण्यास सुरुवात होते. पण केसांच्या समस्यांकडे सतत दुर्लक्ष केल्यामुळे केसांमध्ये टक्कल पडते आणि केसांचा लुक पूर्णपणे खराब होऊन जातो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला केसांची योग्य पद्धतीने काळजी घेण्यासाठी काही महत्वपूर्ण टिप्स सांगणार आहोत. या टिप्स फॉलो केल्यामुळे केसांची मूळ मजबूत होतात आणि केसांची वाढ होते.

वारंवार केस सुंदर करणाऱ्यासाठी केल्या जाणाऱ्या केमिकल ट्रीटमेंट कमी करणे आवश्यक आहे. सतत केमिकल शॅम्पू आणि हेअर केअर प्रॉडक्टचा वापर केल्यामुळे केस कमकुवत होतात. केसांच्या निरोगी वाढीसाठी कायमच घरगुती उपाय करावेत. घरगुती उपाय केल्यामुळे केसांची नैसर्गिक चमक दीर्घकाळ टिकून राहते. यासाठी आठवड्यातून दोनदा केसांना तेलाने मसाज करावा. मसाज केल्यामुळे केसांमधील रक्तभिसरण सुधारते आणि केस मऊ होण्यास मदत होते. केसांच्या मुळांना पोषण देण्यासाठी टाळूवर मसाज करणे आवश्यक आहे. यासाठी भृंगराज, आवळा किंवा नारळ इत्यादी नैसर्गिक तेलांचा वापर करावा.

नियमित योगासने आणि व्यायाम केल्यामुळे मानसिक तणाव कमी होतो. मानसिक तणाव वाढल्यानंतर अचानक केस गळतात. टाळूवरील रक्तभिसरण सुधारण्यासाठी खोबऱ्याच्या तेलाने मालिश करावी. यामुळे केसांना नैसर्गिकरित्या पोषण मिळते. केस कायमच हेल्दी राहण्यासाठी पोषण आहार घेणे आवश्यक आहे. आहारात आवळा, लोह, प्रथिने, ओमेगा– ३ फॅटी ॲसिड असलेल्या पदार्थांचे सेवन करावे.

# सतत लागणाऱ्या उचकीमुळे जीव कासावीस होतो? उचकी थांबवण्यासाठी करा 'हे' घरगुती उपाय, क्षणार्धात दिसेल फरक

उचकी लागणे ही अतिशय सामान्य गोष्ट आहे. पण बऱ्याचदा जेवल्यानंतर किंवा कोणताही पदार्थ खाल्ल्यानंतर लगेच उचकी लागते. खूप काही केल्यानंतर सुद्धा उचकी थांबत नाही. उचकी लागल्यानंतर ती लवकर थांबत नाही. जास्त वेळ उचकी टिकून राहिल्यानंतर जीव कासवीसा होतो. याशिवाय डोकेदुखी आणि छातीमध्ये वेदना होतात. शरीरात निर्माण झालेल्या पोषक घटकांच्या कमतरतेमुळे सुद्धा उचकी लागते. अतिशय सामान्य वाटणारी उचकी काहींच्या आरोग्यासाठी त्रासदायक ठरते. त्यामुळे उचकी लागल्यानंतर पाणी पिण्याचा किंवा साखर खाण्याचा सल्ला दिला जातो. पण काहीवेळा पाणी पिऊन सुद्धा उचकी जात नाही. वारंवार लागणारी उचकी डेली रुटीनमध्ये अनेक अडथळे निर्माण करते. घरातील आजी किंवा इतर मोठी माणसं उचकी थांबवण्यासाठी अनेक वेगवेगळे उपाय सांगतात.



पाणी पिणे, श्वास रोखून धरणे, काहीतरी गोड पदार्थ खाणे इत्यादी अनेक उपाय सांगितले जातात. पण तरीसुद्धा उचकी थांबत नाही. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला वारंवार लागणारी उचकी थांबवण्यासाठी काही घरगुती उपाय सांगणार आहोत. हे उपाय केल्यास तुमची उचकी क्षणार्धात थांबेल आणि आराम मिळेल. कायमच आरोग्यासंबंधित समस्या उद्भवल्यानंतर बाजारातील गोळ्या औषधांचे सेवन कारण्याऐवजी घरगुती उपाय करून आराम मिळवावा. यामुळे क्षणार्धात फरक दिसून येतो.

उचली लागल्यानंतर करून पहा 'हे' घरगुती उपाय: लिंबू आणि मीठ: वारंवार उचकी लागत असेल तर लिंबाच्या फोडीवर मीठ टाकून चोखायला सुरुवात करा. यामुळे तुमची उचकी लगेच थांबेल. लिंबूमधील आंबटपणा मिठाची चव डायाफ्रामला शांत करण्यास मदत करते. यामुळे शरीरावर लगेच सकारात्मक परिणाम दिसून येतात. हा उपाय लहान मुलांना उचकी लागल्यानंतर सुद्धा करू शकता.

थंड पाण्याचे सेवन: उचकी लागल्यानंतर थंड पाण्याचे सेवन करावे. थंड पाण्याच्या सेवनामुळे उचकी लगेच थांबते आणि आराम मिळतो. थंड पाण्याचे सेवन केल्यामुळे घशाचे स्यूनांना आराम मिळतो आणि उचकी थांबते. थंड पाणी पिताना हळूहळू प्यावे. खूप पटापट पाणी प्यायल्यामुळे ठसका लागण्याची शक्यता असते.याशिवाय उचकी लागल्यानंतर साखर खावी. तुम्हाला जर खूप जास्त वेगाने उचकी लागली असेल तर तोंडात टाकलेली साखर हळूहळू चोखुन खावी. पण मधुमेह असणाऱ्या रुग्णांनी हा उपाय अजिबात करू नये.

उचकी (Hiccups) या डायफ्रामच्या अनैच्छिक आकुंचनामुळे होणाऱ्या आवाजाच्या लहरी आहेत. उचकी येण्याची सामान्य कारणे मसालेदार अन्न, जलद जेवण, आणि काही विशिष्ट औषधे असू शकतात.


उचकीची कारणे: डायफ्रामच्या आकुंचनामुळे उचकी येते. मसालेदार पदार्थ खाणे, जलद जेवणे, आणि कार्बोनेटेड पेये पिणे यामुळे उचकी येऊ शकते. छातीत जळजळ, किंवा स्वादुपिंडाचा दाह (pancreatitis) यांसारख्या पचनासंबंधीच्या समस्यांमुळेही उचकी येऊ शकते.

उचकी थांबवण्याचे उपाय: पाणी पिणे किंवा साखर घालून पाणी पिणे उचकी थांबवण्यासाठी एक चांगला उपाय आहे. दीर्घकाळ श्वास रोखून धरल्यास डायफ्रामचे आकुंचन कमी होते आणि उचकी थांबते.

# गायीच्या सेवेसाठी आपले जीवन समर्पित करणारे रवींद्र महाराज देवणीकर शेकडो प्राण्यांचे तारणहार बनले!

देवणी तालुक्यातील एका छोट्या गावात, संपूर्ण जिल्ह्यात एक नाव श्रद्धा आणि प्रेरणेचे प्रतीक बनले आहे – रवींद्र महाराज देवणीकर. लोक उदरनिर्वाहासाठी संघर्ष करत असताना, महाराजांनी इतरांच्या जीवाचे रक्षण करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले आहे. गेल्या काही महिन्यांतील विनाशकारी पावसाने संपूर्ण देवणी प्रदेश उद्ध्वस्त केला आहे. शेते वाहून गेली, झोपड्या कोसळल्या आणि शेकडो प्राणी मृत्युमुखी पडले. पण या भयानक परिस्थितीतही, रवींद्र महाराजांनी हार मानली नाही – त्यांनी एकट्याने सुमारे ३०० ते ४०० प्राण्यांची सुटका केली आणि त्यांना सुरक्षित निवारा दिला. महाराज म्हणतात, गाय ही केवळ एक प्राणी नाही; ती एक अवतार असलेली देवी आहे. तिची सेवा करणे हीच खरी पूजा आहे. त्यांनी हे त्यांच्या कृतीतून सिद्ध केले आहे. मुसळधार पाऊस, भूक आणि आजार या सर्वांवर मात करत. मुसळधार पावसात चार गायी गमावल्याचे दुःख त्यांना खूप जाणवले, परंतु उर्वरित शेकडो प्राण्यांना भूक आणि तहानपासून वाचवण्यासाठी त्यांनी रात्रंदिवस काम केले. वीज, चारा, पाणी किंवा औषधाची कमतरता असूनही – महाराजांनी हार मानली नाही. पावसाच्या पाण्यात अडकलेल्या प्राण्यांना त्यांनी दोरीने ओढले आणि खांद्यावर घेऊन त्यांच्या गोसेवा केंद्रात नेले. आज, त्यांचे केंद्र केवळ प्राण्यांसाठी आश्रयस्थान नाही तर मानवता, करुणा आणि भक्तीचे प्रतीक बनले आहे. गावकरी त्यांना आदराने गौरक्ष महाराज म्हणतात. नाही सरकारी मदत, ना देणगी – तरीही त्यांची सेवा सुरूच आहे. आतापर्यंत, रवींद्र महाराजांना कोणत्याही सरकारी योजनेतून, पंचायतीकडून किंवा सामाजिक सेवा संस्थेकडून एक रुपयाही मदत मिळालेली नाही. तरीही, ते दररोज प्राण्यांसाठी चारा, पाणी आणि औषध गोळा करत राहतात. स्वतः आर्थिक अडचणींना तोंड देत असतानाही ते म्हणतात, या निष्पाप प्राण्यांना चारा देऊन माझी भूक भागते. प्रशासनाकडे मदतीसाठी अनेक







विनंत्या करण्यात आल्या, परंतु कोणीही हस्तक्षेप केला नाही. तरीही, महाराजांचा विश्वास अढळ आहे: जिथे सेवा असते, तिथे देव असतो. =ख गोसेवा केंद्र श्रद्धेचे तीर्थस्थान बनले रवींद्र महाराजांचे गोसेवा केंद्र आता गावकऱ्यांसाठी एक पवित्र तीर्थस्थान बनले आहे. प्रत्येक पर्यटक येथे मिळणाऱ्या शांती, प्रेम आणि करुणेने प्रभावित होऊन परत येतो. मुले, वृद्ध आणि महिला दररोज जनावरांना चारा देण्यासाठी आणि महाराजांच्या आशीर्वादातून प्रेरणा घेण्यासाठी येतात. महाराजांच्या मते, जर प्रत्येक गावातील एक व्यक्ती गायींची सेवा करण्यासाठी पुढे आली तर कोणताही प्राणी उपाशी मरणार नाही. त्यांची दूरदृष्टी अ I ज

समाजासाठी एक जिवंत संदेश आहे. समाज आणि सरकारला नम्र आवाहन. या उदात्त कार्यात सरकार, सामाजिक सेवा संस्था आणि उदार नागरिकांनी सहकार्य करण्याची वेळ आली आहे. गायीची सेवा करणे हे केवळ धार्मिक कर्तव्य नाही तर ती मानवी जबाबदारी आहे. रवींद्र महाराज देवणीकर यांच्या सेवा, समर्पण आणि त्यागाचा सन्मान करणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. रवींद्र महाराजांची कथा आपल्याला शिकवते की– जिथे करुणा असते, तिथे देव असतो. गायीचे रक्षण करणाऱ्या अशा समर्पित हातांना आधार आणि आदर देणे म्हणजे खऱ्या धर्माचे पालन करणे होय.

## दुपारच्या जेवणातील वरण भातासोबत तोंडी लावण्यासाठी बनवा कुरकुरीत कारल्याचे काप, नोट करा रेसिपी

लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं कारल्याची भाजी खायला अजिबात आवडत नाही.कारल्याच्या भाजीचे नाव ऐकल्यानंतर सगळेच नाक मुरडतात. पण आरोग्याच्या दृष्टीने कारल्याची भाजी अतिशय गुणकारी आणि पौष्टिक आहे. यामध्ये असलेले गुणकारी घटक रक्तातील साखर कायमच नियंत्रणात ठेवण्यासाठी कारल्याच्या रसाचे सेवन केले जाते. वाढलेले वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी अनेक लोक कारल्याच्या भाजीचे सेवन करतात. कारल्याची भाजी झटपट तयार होते. आज आम्ही तुम्हाला जेवणात तोंडी लावण्यासाठी कारल्याचे कुरकुरीत काप बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. कारल्याचे काप चवीला अतिशय सुंदर लागतात. जेवणाच्या ताटात जर कारल्याचे काप असतील तर चार घास जेवण जास्त जाईल. चला तर जाणून घेऊया



कुरकुरीत कारल्याचे काप बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: कारल्याचे काप लिंबाचा रस लाल तिखट गरम मसाला हळद मीठ आलं लसूण पेस्ट रवा तांदळाचे पीठ तेल कृती: कुरकुरीत कारल्याचे काप बनवण्यासाठी सर्वप्रथम, कारली स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर त्याच्या आतील बिया काढा. कारल्याचे उभे पातळ काप करून त्यांना मीठ, लिंबाचा रस लावून व्यवस्थित मिक्स करा आणि त्यातील पाणी काढून घ्या. कारल्यातील पाणी काढून टाकल्यामुळे कडूपणा कमी होईल. मोठ्या वाटीमध्ये आलं लसूण पेस्ट, लाल तिखट, हळद, चवीनुसार मीठ, गरम मसाला घालून व्यवस्थित मिक्स करून घ्या. तयार केलेल्या मिश्रणात कारल्याची काप टाकून व्यवस्थित मिक्स करा. काहीवेळ झाकण मारून कारल्याची काप बाजूला ठेवून द्या. ताटात तांदळाचे पीठ आणि रवा, मीठ, लाल तिखट घालून व्यवस्थित मिक्स करा. गरम तव्यावर तेल गरम करण्यासाठी ठेवा. मसाला लावून घेतलेली कारली रव्याच्या मिश्रणात घोळवून तेलात फ्राय करण्यासाठी सोडा. दोन्ही बाजूने कुरकुरीत भाजून घ्या

# नवी मुंबई जिल्हास्तरीय बौध्दाचार्य प्रशिक्षण शिबीर समारोह संपन्न

भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेच्या वतीने संस्कार विभागाच्या अधिपत्त्याखाली संस्कार विभागाचे उपाध्यक्ष आदरणीय विजय झनके गुरुजी ( केंद्रिय शिक्षक ) यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक ०७ / १० / २०२५ रोजी दुपारी ठिक ३ वाजता बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबीर समारोह घेण्यात आला आषाढ पौर्णिमा दिनांक १० जुलै – २०२५ पासुन ते दिनांक ०७ / १० / २०२५ आश्विन पौर्णिमेपर्यंत भव्य असे बौद्धाचार्य प्रशिक्षण नवी मुंबई जिल्हा येथे सुरु होते, त्या प्रशिक्षण शिबीराचा समारोह सुर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर भवन पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर नवी मुंबई. या ठिकाणी सुंदररित्या घेण्यात आला सर्वप्रथम आदर्शांची पुजा उपस्थित प्रमुख अतिथी व मार्गदर्शक राष्ट्रीय – सचिव तथा केंद्रिय प्रशिक्षण विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस . एस . वानखडे यांच्या हस्ते व नवी मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष नामदेव जगताप गुरुजी ( जिल्हाध्यक्ष – नवी मुंबई ) व संजय झनके गुरुजी ( जिल्हा–सरचिटणीस ) व प्रकाश माने गुरुजी ( जिल्हा –कोषाध्यक्ष ) इतर उपस्थित जिल्हा पदाधिकारी व शाखा पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आली सामुहिक त्रिसरण पंचशील व बुद्धपुजा घेण्यात आली . उपस्थित मान्यवरांचा, शाखा पदाधिकारी व उपस्थित बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबीरातील प्रवचनकार यांचा जिल्हा कार्यकारीणीने सत्कार केला . तदनंतर बौद्धाचार्य प्रशिक्षणार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले. नवी मुंबई जिल्हा कार्यकारिणी व प्रवचनकाराचे कौतुक करून त्यांनी मनोगत व्यक्त केले मा. प्रकाश माने गुरुजी ( जिल्हा – कोषाध्यक्ष ) मा. नामदेव जगताप गुरुजी ( जिल्हाध्यक्ष ) यांनी शिबीर समारोप कार्यक्रमात भरभरून शुभेच्छा देवुन चांगले विचार व्यक्त केले. भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सचिव व विभागप्रमुख केंद्रिय प्रशिक्षण विभाग एस. एस. वानखडे यांनी आयोजकांचे खुप चांगल्या प्रकारे कौतुक केले, शिबीरार्थींना बौद्धाचार्य परीक्षेसंदर्भात अप्रतिम मार्गदर्शन केले अनेक मार्मिक उदाहरणे देवुन बौद्धाचार्य शिबिरार्थींमध्ये उत्साह निर्माण करून धम्मकार्य पुढे जोमाने करण्यासाठी उर्जा निर्माण केली . चांगले मार्गदर्शन केले, आपण आंबेडकर परिवाराचे सभासद आहोत. आंबेडकर परिवारासोबत एकनिष्ठ राहुन आपण कार्य केले पाहिजे समाजाचे ऋण फेडले पाहिजे बौद्धाचार्यांना समाजामध्ये मानाचे स्थान आहे खरी परीक्षा आपली समाजामध्ये आहे बुद्धीचातुर्य व अनुभवाचा उपयोग समाजासाठी करावा अप्रतिम मार्गदर्शन डॉ. एस. एस. वानखडे गुरुजी यांनी केले



सर्व शिबीरार्थींचे मा. एस. एस. वानखडे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. शिबीरार्थींनी नवी मुंबई जिल्हा कार्यालय व पंचशील बुद्ध विहारासाठी उउढ्त कॅमेरा सेट व्यवस्था , पंखे व पुजामांडणीसाठी वस्तु भेट दिली, अल्पोपहार व संपुर्ण कार्यक्रमाचा खर्च बौद्धाचार्य प्रशिक्षणार्थी यांनी केला दानपारमितेचे पालन केल्याबद्दल सर्व शिबीरार्थींचे धन्यवाद ! खारघर शाखेचे उपाध्यक्ष आर. बी. भारती गुरुजी ( केंद्रिय शिक्षक ) यांनी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी पोडीयम दान नवी मुंबई जिल्ह्याला दिल्याबद्दल आर. बी. भारती गुरुजींचे धन्यवाद कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय झनके गुरुजी ( उपाध्यक्ष – संस्कार नवी मुंबई जिल्हा ) यांनी खुप चांगल्या प्रकारे आपले विचार व्यक्त करून शिबीरार्थींना परीक्षेसाठी मार्गदर्शक सुचना देवुन शुभेच्छा दिल्यात, हा शिबीर समारोह सोहळा यशस्वी होण्यासाठी संपुर्ण नवी मुंबई जिल्हा पदाधिकाऱ्यांनी चांगले सहकार्य केले, संस्कार विभागाचे उपाध्यक्ष मा . विजय झनके गुरुजी मा. प्रकाश भालेराव गुरुजी ( सचिव – संस्कार ) मा. राजेंद्र झेंडे गुरुजी ( सचिव – संस्कार ) यांचे विशेष धन्यवाद ! मा. सतिष खंडाळे ( अध्यक्ष – पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर , मा. संतोष जाधव, मा .अप्पासाहेब खंडाळे मा. अनिल सुरडकर यांनी शिबीर यशस्वी होण्यासाठी खुप चांगल्या प्रकारे सहकार्य करून मेहनत घेतली. व इतर शिबीरार्थींचे सुद्धा खुप खुप धन्यवाद ! मा. दत्ताश्रेय भालेराव गुरुजी ( सचिव – पर्यटन ), मा. गौतम सोनकांबळे गुरुजी ( संघटक ), मा. हिरामण थोरात गुरुजी ( संघटक ), मा. पांडुरंग भालेराव गुरुजी (संघटक ), मा. धनराज मनोरे ( सचिव – संरक्षण ), मा . सिंधुताई कांबळे ( सैनिक ), मा. राजश्रीताई पारधे ( सचिव – पर्यटन ), मा. कल्पनाताई कांबळे ( संघटक ), मा. कविताताई कांबळे ( संघटक ), मा. मनिषाताई कांबळे ( संघटक ), मा. अलकाताई आढाव केंद्रिय शिक्षिका तद्वतच अध्यक्ष – जुईनगर शाखा ), मा. सुधीर जगधनी ( कोषाध्यक्ष – जुईनगर शाखा ), मा. किरण सावंत ( केंद्रिय शिक्षक ), मा. सुनिल गंगावणे ( मा. सचिव संस्कार ), मा. संतोष वाढवे ( केंद्रिय शिक्षक व सरचिटणीस करावेगांव शाखा ), मा. नितिन बनसोडे ( कोषाध्यक्ष – पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर ), मा .दत्तात्रय हराळ, मा. सुनिता हराळ ( केंद्रिय शिक्षिका ), व इतर जिल्हा पदाधिकारी व शाखा पदाधिकारी बौध्दाचार्य प्रशिक्षणार्थी प्रामुख्याने उपस्थित राहुन शिबीर समारोह सोहळा यशस्वी केला. सर्व केंद्रिय शिक्षक व केंद्रिय शिक्षिका प्रवचनकारांचे धन्यवाद ! बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबीर समारोह सोहळ्याचे सुत्रसंचालन मा. संजय झनके गुरुजी ( जिल्हा – सरचिटणीस ) व आभारप्रदर्शन मा. प्रकाश माने गुरुजी ( जिल्हा – कोषाध्यक्ष ) यांनी केले, सरणत्तय घेवुन बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबीराचा समारोप करण्यात आला.

## लातूर शहर भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी शितल मालू यांची नियुक्ती




लातूर : भारतीय जनता पार्टीच्या लातूर शहर महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी माजी नगरसेविका सौ. शितल विनोद मालू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी भाजपा वरिष्ठ नेत्यांच्या संमतीने ही नियुक्ती केली आहे.

भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी नुकतीच शहर जिल्हा कार्यकारिणी घोषित केली आहे. त्यामध्ये महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी धडाडीच्या महिला नेत्या सौ. शितल विनोद मालू यांच्यावर सोपवली आहे. लातूर शहर महानगरपालिकेच्या नगरसेविका म्हणूनही त्यांनी अत्यंत उल्लेखनीय काम केले आहे. आपल्या प्रभागातील समस्यांची सोडवणूक करण्याकामी प्रसंगी रस्त्यावर उतरण्यासही त्या मागेपुढे पाहत नाहीत, याची प्रचिती त्यांच्या प्रभागातील मतदारांनी अनेकदा घेतली आहे. पक्षाच्या नेत्यांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी आपण अतिशय प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही त्यांनी या नियुक्तीनंतर बोलताना दिली. लातूर शहरातील समस्यांची जाण असलेल्या आणि त्या समस्यांची सोडवणूक कशी करायची याचा त्यांना चांगला अभ्यास असल्याने पक्षाने एका धडाडीच्या आणि संघर्षशील महिला नेतृत्वाला योग्य संधी दिल्याबद्दल अनेकांनी त्यांच्या या नियुक्तीचे स्वागत केले आहे. शितल मालू यांनीही आपली ही नियुक्ती आपल्या कामाच्या माध्यमातून सार्थ ठरवून आपण पक्षाच्या नेत्यांनी आपल्यावर विश्वास दाखविला आहे, तो विश्वास आगामी मनपा निवडणुकीत भाजपचे सर्वाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी आपण नेत्यांच्या आदेशाप्रमाणे काम करू अशी भावना बोलून दाखविली आहे.

## उमंग इन्स्टिट्यूटमध्ये मेंटल हेल्थ, ऑडिओलॉजी व सेरेब्रल पाल्सी दिनानिमित्त पालक मेळावा व मार्गदर्शन शिबिर





लातूर :– उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटिझम अँड मल्टीडीसाबिलिटी रिसर्च सेंटर, लातूर येथे मेंटल हेल्थ डे, ऑडिओलॉजी डे व सेरेब्रल पाल्सी डे निमित्त पालक मेळावा व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर्सनी उपस्थित पालकांना सखोल मार्गदर्शन केले. बालरोग तज्ञ डॉ. अशोक आरदवाड, स्त्रीरोग तज्ञ डॉ. ज्योती सुळ, बालरोगतज्ञ डॉ. विकास साळुंके, अस्थिरोग तज्ञ डॉ. श्रीनिवास संदिकर यांनी त्यांच्या–त्यांच्या विषयातील महत्त्वपूर्ण माहिती व मार्गदर्शन दिले.मार्गदर्शन सत्रानंतर तज्ञांनी दिव्यांग मुलांच्या पालकांशी संवाद साधत त्यांच्या शंका व समस्यांवर सविस्तर चर्चा केली. या उपक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.कार्यक्रमास संस्थेचे श्री. किरण उटगे, व्यवस्थापक ड. श्रीहरी गोरे, रामेश्वर जाधव,डॉ. श्रीशैलम तलारी, गणेश डोंगरे, डॉ. मंदिरा हौसले, डॉ. अर्जुन राठोड, डॉ. प्रतीक केंद्रे, डॉ. प्रवीण राठोड, डॉ. वैभव उटगे, डॉ. वैष्णवी शिंगण तसेच उमंग सेंटरचे कर्मचारी, उमंग स्पेशल स्कूलचे शिक्षक व पालकवर्ग उपस्थित होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मंदिरा हौसले यांनी केले तर आभार प्रदर्शन ड. श्रीहरी गोरे यांनी मानले.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ सोमवार रोजी केज तहसील कार्यालयासमोर निदर्शने

केज/प्रतिनिधी सरन्यायाधिष भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ सोमवार रोजी केज तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहे तरी केज तालुक्यासह शहरातील बौद्ध समाज बांधवांनी व संविधान प्रेमी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन दलित चळवळीतील सर्व संघटना व पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. त्यासंबंधी तहसीलदार केज यांना दलित चळवळीतील सर्व संघटना व सर्व पक्षीय प्रमुख पदाधिकारी यांच्यावतीने लेखी निवेदन देण्यात आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर एका मनोवादी विचारसरणीच्या वकिलाने न्यायालयात हल्ला केला.हा हल्ला म्हणजे देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेवर केला असून या निंदनीय घटनेचा केज तालुका सर्व दलित संघटना,





व सामाजिक संस्था यांच्या वतीने दिनांक१३ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळी अकरा वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघून तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत. अशा मनुवादी विचारसरणीच्या हल्लेखोरावर कठोर कारवाई करण्या संदर्भात योग्य ती कारवाई करण्यात यावी. या मागणीचे लेखी निवेदन तहसीलदार केज यांना देण्यात आले आहे. सदर निवेदन हे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी स्वीकारले आहे. या लेखी निवेदनावर चंद्रकांत खरात सर, दीपक कांबळे, अशोक गायकवाड, लखन हजारे,गौतम बचुटे,तात्या गवळी, आम्रपालीताई गजेशीव, आश्रुबा खरात, कपिल मस्के, दिलीप बनसोडे, बाळासाहेब जाधव, विवेक बनसोड, किरण जोगदंड, समाधान बुचुटे, किरण कसबे इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील झालेल्या हल्ल्याचा निषेध व्यक्त करून घोषणाबाजी करण्यात आली.

## विक्रम चहा उद्योग समूहाचे प्रमुख रमेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त फळांचे वाटप

### केज येथील शेरीन एजन्सीचा स्तुत्य उपक्रम





केज/प्रतिनिधी विक्रम चहा उद्योग समूहाचे प्रमुख रमेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त केज, कळंब, धारूर येथील शेरीन विक्रम चहा एजन्सीचे प्रमुख सोहेल सिद्दिकी यांच्या वतीने केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळाचे वाटप व केज शहरालगत बोबडेवाडी रोडवरील स्वामी समर्थ वृद्धाश्रमातील वृद्धांना फळांचे वाटप करून जेवण देण्यात आले. शेरीन एजन्सीचे सोहेल सिद्दिकी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, आमचे मार्गदर्शक तथा विक्रम चहा उद्योग समूहाचे प्रमुख रमेशभाई पटेल यांना समाजकार्याची आवड आहे व ते सातत्याने समाजकार्य करत आहेत आम्हाला त्यांच्या समाजकार्याचा वसा लाभलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही सामाजिक बांधिलकी जपत आहोत. आमचे मार्गदर्शक तथा विक्रम चहा उद्योगसमूहाचे प्रमुख रमेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळाचे वाटप करून वृद्धाश्रमातील वृद्धांची सेवा करण्याचा छोटासा प्रयत्न करत आहोत. यापुढेही गोरगरिबांची सातत्याने सेवा करण्याचा प्रयत्न करू असे बोलताना सोहेल सिद्धीकी यांनी सांगितले आहे. पुढे बोलताना सिद्धीकी म्हणाले की, विक्रम चहाच्या माध्यमातून रमेशभाई पटेल यांचे फार मोठे योगदान आहे आमच्या सारख्या गोरगरिबांना त्यांनी हाताला काम देऊन सर्वांना मोठे केले आहे आज रोजी आमची शेरिन एजन्सी ही केज,धारूर,कळंब या तीन तालुक्यांमध्ये काम करत आहे. यावेळी शेरीन एजन्सीचे सोहेल सिद्दिकी, नवाज सिद्दिकी, सेफ सिद्दिकी, हसनेन सिद्दिकी, उत्तरेश्वर गोडसे, साईनाथ चव्हाण, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे, डॉ.फिजा मॅडम, लॅब टेक्निशन श्रीकृष्ण नागरगोजे, नर्स सविता भोपळे, संगीता चिंतामणी, सुनिता जगताप, सुनिता कदम, आशिया शेख, स्वामी समर्थ वृद्धाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष बापू कराड, व्यापारी महासंघाचे सुहास छिद्रवार यांच्यासह डॉक्टर, नर्स,ब्रदर,कर्मचारी व वृद्धाश्रमातील आजी–आजोबा यांची उपस्थिती होती. विक्रम चहा उद्योग समूहाचे प्रमुख रमेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त केज शहरात शेरीन एजन्सीच्या वतीने विविध उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात आला शेरीन एजन्सीच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## एमआयटीत दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रोकॉन २०२५ फिजिओथेरपी परिषदेचे आयोजन

लातूर : – महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर यांच्या वतीने दि. ११ व १२ ऑक्टोबर रोजी संत ज्ञानेश्वर डोम येथे आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रोकॉन २०२५ परिषद होणार आहे. या परिषदेत भारत आणि परदेशातील प्रसिध्द फिजिओथेरपी तज्ञ, संशोधक, चिकित्सक आणि विद्यार्थी इलेक्ट्रोथेरपी आणि पुनर्वसन विज्ञानातील नवकल्पना आणि प्रगतीवर चर्चा करण्यासाठी एकत्रीत येणार आहेत. इलेक्ट्रोकॉन २०२५ परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील अलाईड हेल्थ सायन्सचे अधिष्ठाता डॉ. वाय. प्रविण कुमार यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, सचिव डॉ. सिंगारावेल्लन यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शनिवार पासून सुरू होणाऱ्या परिषदेत विविध सत्रांमध्ये प्रत्यक्ष कार्यशाळा, तज्ञ प्रात्यक्षिके आणि थायलंड आणि फिलीपिन्समधील तज्ञांसह अल्ट्रासाऊंड थेरपी आणि मॅन्युअल थेरपी सारख्या विविध विषयांवर फिजिओथेरपी व्यावसायिकांमध्ये क्लिनिकल आणि संशोधन क्षमता वाढविण्याच्या उद्देशाने परस्परसंवादी चर्चा होणार आहे. पुराव्यावर आधारित पध्दती, नवोपक्रम, आधुनिक पुनर्वसन तंत्रज्ञान आणि त्यापलीकडे समग्र उपचार दृष्टिकोन यातील दरी भरून काढणे हा या परिषदेचा उद्देश आहे. या परिषदेसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, महिडोल विद्यापीठ, थायलंड, सँटो टोमस विद्यापीठ, फिलीपिन्स येथील फिजिओथेरपी संस्था आणि आरोग्यसेवा संस्थांसह प्रख्यात विद्यापीठांचा सहभाग असणार आहे.

## केज शहरात तळीरामाचा भर रस्त्यात उच्छाद केज पोलिसांचा कानाडोळा की वक्रदृष्टी

केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील केज तालुक्या सह शहरात जागोजागी तळीरामाने उच्छाद मांडला आस्ताना शहरात जागोजागी मटका, गुटखा, हातभट्टी दारू, गल्लीबोळामध्ये सर्रासपणे देशी दारू यासह अवैध प्रवासी वाहतूक सर्रास चालू असताना केज पोलिस स्टेशन या कडे कानाडोळा करत अवैध धंदे करण्यासाठी मुक संमती देत आहे की काय? आसे नागरिकांमधून बोलताना दिसते,भर रस्त्यावर तर तळीरामाने उच्छाद मांडला आस्ताना नागरिकांना व वाहन चालकांना रस्त्यावर त्रास सहन करावा लागत आहे, परंतु याकडे केज पोलिस मुग गिळुन गप्प का? आसा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. केज शहरांमध्ये व तालुक्यात गल्लीबोळामध्ये सर्रासपणे हातभट्टी दारू व देशी दारूची राजरोजपणे विक्री केली जात आहे. त्याचबरोबर शासकीय कार्यालयाच्या परिसरात राजरोजपणे मटका खेळला



जातो व घेतला जात आहे. शहरातील अनेक ठिकाणी बारा ते अठरा वर्षाखालील तरुण हे विविध प्रकारची नशा करत आहेत. सध्या शहरांमध्ये कॅरीबॅग मध्ये सोल्युशन टाकून नशा करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात निदर्शनास येत असून यासह अनेक प्रकारच्या नशा तरुण युवक करत असल्यामुळे अनेक तरुणांना स्वतःचा जीव गमवावा लागला आहे अनेकांचे संसार उघड्यावर आलेले आहेत अशा जनसामान्यातून प्रतिक्रिया ऐकण्यास मिळत आहेत. अवैध व्यवसाय करणाऱ्यांना नेमका अभय कोणाचा आहे असा जनसामान्यातून सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासन अवैध व्यवसायाकडे लक्ष देईल का? व्यसनापासून तरुणाची सुटका केली जाईल का? असा प्रश्न जनसामान्यातून उपस्थित केला जात आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.